# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक क्र.२७२/२०२५

**विषय : आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या वार्षिक अर्थसंकल्प प्रस्तावाबाबत....**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३३ (१) अन्वये वार्षिक अर्थसंकल्प नवीन आर्थिक वर्ष सुरू होण्यापूर्वी किमान दोन महिने अगोदर वित्त व लेखा समितीच्या निर्देशाअन्वये तयार करावा लागतो. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १८ (६) (ड) अन्वये वित्त व लेखा अधिकारी यांनी तयार केलेला अर्थसंकल्प वित्त व लेखा समितीच्या विचारार्थ व शिफारशीकरिता सादर केला जातो. त्यानंतर व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीसह प्रस्तावित अर्थसंकल्प अंतिम मंजूरीसाठी अधिसभेपुढे सादर केला जातो. ही कार्यप्रक्रिया सुरु करण्याकरिता **आपल्या शैक्षणिक / प्रशासकीय विभागाचे प्रस्ताव सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात भरावेत. विभागीय समितीच्या शिफारशीसह उचित तरतुदीचा प्रस्ताव पाठविण्यात यावा. यासोबत खालील माहीती व योग्य त्या अधिकार मंडळाची मंजुरीपत्रके इ. जोडण्यात यावी.**

**आर्थिक वर्ष २०२६-२७ चा प्रस्ताव पाठविताना खालील बाबी विचारात घ्याव्यात, ही विनंती.**

१) अर्थसंकल्पाचा प्रस्ताव सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात (प्रपत्र अ, ब, क, ड व इ) संपूर्ण माहितीसह पाठवावा.

२) आपल्या विभागातील विकास (भांडवली खर्च) या अर्थशिर्षातंर्गत आर्थिक वर्ष २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये आपणास शास्त्रीय सामुग्री व उपकरणे, संगणक, संगणक प्रणाली (Software), कार्यालयीन साधनसामग्री व उपकरणे, पुस्तके या उपअर्थशिषांतर्गत खरेदी करता येईल. यामधून जी खरेदी आपण करणार आहात, त्यांच्या नावासह व अंदाजीत किंमतीसह यादी जोडण्यात यावी. दिलेल्या यादीतील किंमतीप्रमाणे आपणांस तरतूद देण्याचा प्रयत्न केला जाईल.
(**टिप-** संगणक प्रणाली (Software) यासाठी विभागनिहाय अपेक्षित असलेली तरतूद कळविण्यात यावी. माहिती तंत्रज्ञान कक्ष (IT Cell) यांच्याकडे एकत्रित तरतूद दर्शविण्यात येऊन त्यांच्या मार्फत खरेदी प्रक्रिया करण्यात येईल)

३) आपल्या विभागामध्ये स्वयंनिर्वाही अभ्यासक्रम व योजना (प्रत्यक्ष जमेपोटी ) चालू असल्यास त्याचाही सर्व तपशील अर्थशिर्षनिहाय **प्रपत्र "अ"** व **प्रपत्र "ब"** प्रमाणे भरणे आवश्यक आहे. स्वयंनिर्वाही अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषद यांच्या ठरावाच्या मंजुरीची छायांकित प्रत सोबत जोडणे, तसेच स्वयंनिर्वाही अभ्यासक्रम व योजना यांच्या खर्चाची देखभाल व विकास या अंतर्गत आपणांस अर्थशिर्षाच्या नावासह वेगवेगळी अर्थतरतूद दार्खविणे आवश्यक आहे. त्यानुसार आपणास अर्थशिर्षनिहाय तरतूद देण्याविषयी निर्णय घेता येईल.

४) आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या वार्षिक अंदाजामध्ये जर तरतुदींमध्ये मागील वर्षापेक्षा वाढ दर्शविली असेल तर त्याचे योग्य ते समर्थन देणे अत्यावश्यक आहे.

५) स्वतंत्र प्रकल्प व योजनांचा (अनुदाने) : अर्थसहाय्य करणा-या संस्था, तसेच प्रकल्प/योजनानिहाय जमाखर्च करावयाचा असल्यामुळे - **प्रपत्र "क"** मध्ये प्रस्ताव देण्यात यावा.

६) शिक्षण शुल्कामध्ये आर्थिक वर्ष २०२४-२५ पासून वाढ केली असल्यास, संबंधित वाढीव शुल्काचे परिपत्रक सोबत जोडावे. त्यास व्यवस्थापन परिषदेची मान्यता असलेल्या ठरावाच्या छायांकित प्रती जोडाव्यात. तसेच शिक्षक, शिक्षकेतर, विद्यार्थी व शिक्षणशुल्क याचा तपशील **प्रपत्र "ड"** मध्ये देण्यात यावा. स्वयंनिर्वाही अभ्यासक्रमामध्ये घेतलेल्या विद्यार्थ्यांचा व शिक्षण शुल्काचा तपशील **प्रपत्र "ड"** मध्ये अंतर्भूत करण्यात यावा. तसेच घेण्यात येणारे शिक्षणशुल्क व इतर शुल्क याचे परिपत्रक सोबत जोडावे.

७) अर्थसंकल्प प्रस्ताव संचालक, प्रशाळा यांच्या स्वाक्षरीने सादर करण्यात यावे. संचालक, प्रशाळा यांच्या स्वाक्षरी शिवाय स्वतंत्रपणे कोणत्याही विभागाचे अर्थसंकल्प प्रस्ताव स्वीकारण्यात येणार नाहीत.

८) केलेल्या तरतुदींचा अर्थशिर्षनिहाय खर्च विभागाकडून कसा होणार आहे याचे विवरण **प्रपत्र "इ"** प्रमाणे भरणे आवश्यक आहे.

विद्यापीठातील सर्व विभागप्रमुख व प्रशासकीय शाखाप्रमुख, वित्तशाखा प्रमुख व इतर संबंधितांनी वरील सूचनांची नोंद घेवून आपल्या विभागाचे प्रस्ताव **एक प्रतीमध्ये** अर्थसंकल्प कक्ष, वित्त व लेखा विभाग यांचेकडे **दि. ०८ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत** पाठवावेत. अपूर्ण माहिती भरलेले, सही व विभागाचे नाव (शिक्का) नसलेले प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. दिलेल्या कालमर्यादेत प्रस्ताव न पाठविल्यास प्रस्ताव विचारात घेतला जाणार नाही. **कालमर्यादेचे बंधन विचारात घेऊन प्रस्ताव पाठविण्याबाबत वित्त व लेखा विभागास सहकार्य करावे, ही विनंती.**

(सीएमए (डॉ.)चारूशीला गायके)
**वित्त व लेखा अधिकारी**

गणेशखिंड, पुणे ४११००७
जा.क्र.वित्त/अर्थसंकल्प/२०२५-२६/४६४
दिनांक : ०६ ऑक्टोबर, २०२५

**सोबत**- प्रपत्र- अ, ब, क, ड, इ

**प्रत कार्यवाहीसाठी-** १) मा. संचालक, प्रशाळा
२) मा. विभागप्रमुख,
३) मा. प्रशासकीय शाखाप्रमुख
४) वित्तशाखा प्रमुख यांना असे कळविण्यात येते की प्रपत्र 'क' (स्वतंत्र प्रकल्प व योजना - अनुदाने) पूर्णपणे भरुन त्याची एक प्रत मा. विभागप्रमुख यांना व एक प्रत अर्थसंकल्प कक्षास पाठविण्यात यावी.

**प्रत माहितीसाठी-** १) मा. कुलगुरु
२) मा. प्र-कुलगुरु
३) मा. कुलसचिव

**प्रपत्र ''अ''**
**अर्थसंकल्प जमा बाजु**

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**अर्थसंकल्प २०२६-२०२७**
**विभागाचे नांवः** -----------------------------------------

| अर्थसंकल्प शीर्ष | २०२४-२०२५ प्रत्यक्ष जमा | २०२५-२६ अंदाज | ३०.०९.२०२५ प्रत्यक्ष जमा* | २०२५-२६ सुधारित अंदाज | २०२६-२०२७ अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| **अ) सर्वसाधारण निधी-** | | | | | |
| १. शिक्षण शुल्क | | | | | |
| २. अन्य शुल्क | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |
| ५. | | | | | |
| बेरीज (अ) | | | | | |
| **ब) स्वयंनिर्वाही योजना व अभ्यासक्रम-** | | | | | |
| १. प्रवेश परीक्षा शुल्क | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |
| बेरीज (ब) | | | | | |

**सही :**
**विभागप्रमुखांचे नाव :**
**शिक्का :**

*** वेगळे तक्ता करुन जोडावा. (पुढील पानाप्रमाणे)**

D:\Dr.Bhagwat\Budget other papers/paripatrak

## * प्रत्यक्ष जमा तपशील

| | | | |
|---|---|---|---|
| विभागाची विद्यार्थी प्रवेश क्षमता – पदवी/ पदव्युत्तर अभ्यासक्रम वर्षनिहाय | | | |
| विभागाची प्रत्यक्ष प्रवेश संख्या | | | |
| संवर्गनिहाय विद्यार्थी संख्या | | | |
| संवर्गाचे नाव | संख्या | प्रतिविद्यार्थी शुल्क | एकूण शुल्क |
| | | | |
| | | | |
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| विभागाची विद्यार्थी प्रवेश क्षमता – पीएच.डी. | | | |
| विभागाची प्रत्यक्ष प्रवेश संख्या | | | |
| संवर्गनिहाय विद्यार्थी संख्या | | | |
| संवर्गाचे नाव | संख्या | प्रतिविद्यार्थी शुल्क | एकूण शुल्क |
| | | | |
| | | | |
| | | | |

*** स्वयंनिर्वाही अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी प्रवेशाचेसुध्दा वरीलप्रमाणे तक्ते तयार करावेत.**

**सही :**
**विभागप्रमुखांचे नाव :**
**शिक्का :**

**प्रपत्र ''ब''**
**अर्थसंकल्प खर्च बाजु**

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**अर्थसंकल्प २०२६-२०२७**

**विभागाचे नांवः** -----------------------------------

| अर्थसंकल्प शीर्ष | २०२४-२०२५ प्रत्यक्ष खर्च | २०२५-२६ अंदाज | ३०.०९.२०२५ प्रत्यक्ष खर्च | २०२५-२६ सुधारित अंदाज | २०२६-२०२७ अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| **अ) देखभाल (वेतनाव्यतिरिक्त)-** | | | | | |
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |
| ५. | | | | | |
| बेरीज (अ) | | | | | |
| **ब) विकास-** | | | | | |
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |
| बेरीज (ब) | | | | | |
| बेरीज (अ+ ब) | | | | | |
| **क) स्वयंनिर्वाही अभ्यासक्रम व योजना (प्रत्यक्ष जमेपोटी)** | | | | | |
| (I) देखभाल | | | | | |
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| (II) विकास | | | | | |
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| बेरीज (क) (I + II) | | | | | |

**सही** :

**विभागप्रमुखांचे नाव** :

**शिक्का** :

प्रपत्र ''क''

स्वतंत्र प्रकल्प व योजना- (अनुदाने)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

अर्थसंकल्पः २०२६-२०२७ विभागाचे नांवः -------------------------------------

| | | जमा | | | | | खर्च | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| योजनेचे/प्रकल्पाचे नांव | अनुदान संकेत क्रमांक | २०२४-२५ प्रत्यक्ष जमा | २०२५-२६ अंदाज | ३०.०९.२५ प्रत्यक्ष जमा | २०२५-२६ सुधारीत अंदाज | २०२६-२७ अंदाज | २०२४-२५ प्रत्यक्ष खर्च | २०२५-२६ अंदाज | ३०.०९.२५ प्रत्यक्ष खर्च | २०२५-२६ सुधारीत अंदाज | २०२६-२७ अंदाज |

I. **विद्यापीठ अनुदान आयोग-(UGC)**

१)

२)

------------------------------------------------------------------------------------------------

बेरीज :

II. **भारत सरकार अनुदान-(GOI)**

१)

२)

------------------------------------------------------------------------------------------------

बेरीजः

III. **वैज्ञानिक तथा औद्योगिक अनुसंधान परिषद-(CSIR)**

१)

२)

------------------------------------------------------------------------------------------------

बेरीजः

IV. **राज्यसरकार अनुदानित-(State)**

१)

२)

------------------------------------------------------------------------------------------------

बेरीजः

V. **अन्य मान्यवर संस्था-(OIB)**

१)

------------------------------------------------------------------------------------------------

बेरीज :

**वित्तशाखा प्रमुख** **विभागप्रमुख**

**प्रपत्र ''ड''**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विभागाचे नांव :**

**शिक्षक, शिक्षकेतर, विद्यार्थी व शिक्षण शुल्क याचा तपशीलः**

१. शिक्षक व शिक्षकेतर सेवकांचा तपशीलः

| अ.क्र. | सेवकाचा तपशील | मंजूर पदे | भरलेली पदे |
|---|---|---|---|
| १) | प्राध्यापक | | |
| २) | प्रपाठक | | |
| ३) | व्याख्याता | | |
| ४) | शिक्षकेतर (तपशील द्यावा) | | |
| ५) | इतर (तपशील द्यावा) | | |
| | एकूणः | | |

२. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात ज्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेतला आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या व शिक्षण शुल्काबाबतचा तपशील-

| **अभ्यासक्रमाचे नांव** | **प्रवेशक्षमता (विद्यार्थीसंख्या)** | **२०२५-२६ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या** | | | **एका विद्यार्थ्यामागे घेण्यात येणारे शुल्क** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महाराष्ट्रा-तील | महाराष्ट्रा-बाहेरील | परदेशी | शिक्षण शुल्क | प्रयोगशाळा शुल्क | अन्य शुल्क | एकूण शुल्क |
| **अ) अभ्यासक्रमाचे नांवः-** | | | | | | | | |
| १) पदवी/ पदव्युत्तर | | | | | | | | |
| २) पीएच्.डी. | | | | | | | | |
| ३) इतर | | | | | | | | |
| बेरीजः- | | | | | | | | |
| **ब) स्वयंनिर्वाही अभ्यासक्रम व योजनाः-** | | | | | | | | |
| १) | | | | | | | | |
| २) | | | | | | | | |

**सही :**

**विभागप्रमुखांचे नाव :**

**शिक्का :**

**प्रपत्र ''इ''**

**अर्थसंकल्प खर्च बाजु**

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**अर्थसंकल्प २०२६-२०२७**

**विभागाचे नांवः** ------------------------------------

**तरतुदीनुसार खर्चाचे नियोजन**

| अ.क्र. | अर्थशिर्षाचे नाव | एकूण तरतूद | एप्रिल ते जून | जुलै ते सप्टेंबर | ऑक्टोंबर ते डिसेंबर | जानेवारी ते मार्च |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ)** | **देखभाल (वेतनाव्यतिरिक्त)** | | | | | |
| १ | प्रयोगशाळा आणि इतर आवर्ती व्यय | | | | | |
| २ | सहाय्यकारी शिक्षकांचे मानधन | | | | | |
| ३ | देखभाल, दुरूस्ती व इतर खर्च | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |
| ६ | | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **ब)** | **विकास** | | | | | |
| १ | शास्त्रीय सामग्री व उपकरणे | | | | | |
| २ | पुस्तके | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |

**सही :**

**विभागप्रमुखांचे नाव :**

**शिक्का :**